HGH INDIA® 2019
HOME DECOR ■■■ GIFTS ■■■ HOUSEWARE
JULY 2-4, 2019 MUMBAI, INDIA
NEWS 4
A TEXZONE Event
Where business feels at home!

## होम डेकोर

# वॉलपेपर्स, फ्लोरिंगस, ड्राय फ्लावर्स, हँडीक्राफ्ट्स, ॲक्सेसरीज ॲण्ड मोअर

एचजीएच इंडिया २०१९ मध्ये, भिंती, छत, टेबल्स, खिडक्या आणि दारे तसेच बाल्कनी, टेरेस आणि गार्डन अशा आऊटडोअर जागांसाठीच्या डिझाइन्स आणि उत्पादनांचा विचार केल्यास एक विभाग म्हणून होम डेकोरमध्ये अनेक संधी आणि शक्यता दडल्या आहेत.

टेक्सटाईल्स, वूड, पीव्हीसी आणि पॉलीप्रोपीलिन यासारखे कृत्रिम घटक तसेच कारपेट टाईल्स असे फ्लोअर कव्हरिंगचे अनेक पर्याय, प्रीमिअम तसेच परवडणाऱ्या दरातील वॉलपेपर्स ते वॉल फिनिशेसमधील आधुनिक रेंज, रबर मॅट्स, कॉयर मॅट्स, आर्टिफिशिअल ग्रास आणि ग्रीन वॉल्स, नॅचरल ड्राइड फ्लावर्स आणि प्लांट्स ते फ्रेगनन्सेस आणि आर्टिफिशिअल फ्लावर्स, डेकोरेटिव्ह कँडल्स, कँडल स्टँड ते अरोमा ऑईल... वासेस, फ्लास्क्स, फिगरिन्स, आर्टेफॅक्ट्स, पेंटिंग्स, म्युरल्स, टेबल टॉप्स अशा डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीज, सिरॅमिक्स, टेरा कोटा, लाकूड, काच, धातू, वेत आणि बांबूपासून बनवलेल्या अनोख्या हस्तकलेच्या वस्तू, स्टील, काच, प्लास्टिक आणि ॲक्रेलिकमध्ये बनवेल्या सुंदर आधुनिक डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीज... शँडेलिअर्स, डेकोरेटिव्ह लाइट्स, लॅम्प शेड्स, गार्डन लाईट्सपासून गार्डन फर्निचर आणि आऊटडोअर डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीज... हॉल २ मधील होम डेकोर विभागातील प्रदर्शकांनी मांडलेल्या प्रदर्शनात अमर्याद पर्याय आहेत!

मागील पर्वाच्या तुलनेत होम डेकोर विभागात २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. रीटेलर्स आणि कॉर्पोरेट गिफ्ट बार्यसना अनेक नव्या वस्तू पाहता येतील आणि नवे सोर्सेस मिळवता येतील. उत्तम डिझाइन्स आणि उपयुक्ततेचा सुरेख मेळ घातलेल्या वस्तूंची मागणी ग्राहकांकडून वाढत आहे. त्यामुळे, या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वच उत्पादनांवर उत्पादकांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. हॉल २ मध्ये यंदा अधिक चांगले पॅकेजिंग आणि सादरीकरणही दिसून येईल.


मार्शल्स

पारंपरिक रंगांऐवजी वॉलपेपर्ससारख्या आधुनिक आणि इको फ्रेंडली घटकांचा वापर करण्याकडे भारतीय ग्राहकांचा कल वाढत आहे. त्यामुळे, हॉल २ मधील वॉलपेपर विभागातही व्हिजिटर्सना अनेक नव्या संधी उपलब्ध आहेत.

काश्मिर, जयपूर, जोधपूर, मुरादाबाद, फिरोजाबाद, लखनऊ, भूज, आग्रा, राजकोट, दिल्ली, मुंबई, बेंगळुरु, कोलकाता, चेन्नई अशा विविध ठिकाणचे भारतीय प्रदर्शक हाताने बनवलेले आणि मशिनने बनवलेले विविध डेकोरेटिव्ह आयटम्स सादर करतील.

बेल्जिअम, यूके, जर्मनी, ईटली, फ्रान्स, द नेदरलँड्स, स्पेन, यूएसए, कोरिआ, सिंगापोर, चीन, तैवान, व्हिएतनाम आणि यूएई येथील आंतरराष्ट्रीय उत्पादक आणि ब्रँड्स थेट किंवा त्यांच्या भारतीय भागीदारांच्या माध्यमातून वॉलपेपर्स, फ्लोअर कव्हरिंग्ज आणि डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीजची श्रेणी सादर करतील.

**वॉलपेपर्स :** सुमारे १०० टक्के वार्षिक वाढीसह वॉलपेपर्स हा भारतातील होम डेकोरमधील सर्वाधिक वेगाने वाढणारा विभाग आहे. परवडणाऱ्या दरातील, मध्यम आणि श्रीमंत वर्गातील, असे सगळेच ग्राहक पारंपरिक रंग, पॉलिश आणि भिंतींच्या सजावटीच्या इतर पर्यायांऐवजी वेगाने वॉलपेपर्सकडे वळत आहेत. ग्राहक आता आरोग्य आणि पर्यावरणाप्रति अधिकाधिक जागरुक होऊ लागल्याने ते आपले घर सजवताना अधिक सोयीस्कर आणि वेळेची बचत करणारे पर्याय निवडतात. अर्थातच, येत्या काही वर्षात वॉलपेपर्स हा साहजिकच इतर पर्यायांना मागे टाकेल. त्यामुळे, वॉलपेपर्सची वाढती मागणी हा भारतीय बाजारपेठेतील दिर्घकालीन ट्रेंड आहे.

ऑल इंडिया वॉल पेपर कव्हरिंग्स (एआयडब्ल्यूए) तर्फे आपल्या २० सदस्यांसह हॉल २ मध्ये भव्य एआयडब्ल्यूए पवेलियन आयोजित करण्यात आले आहे. फ्रॅगनंट वॉलपेपर्स, ग्लोइंग वॉलपेपर्स, ३डी वॉलपेपर्स अशा अनेक नाविन्यपूर्ण उत्पादनांसोबतच प्रीमिअम आणि परवडणाऱ्या दरातील उत्पादनांची रेग्युलर रेंजही इथे सादर केली जाणार आहे.


एनजीसी नफीज

इनोव्हेशन ■ ट्रेण्ड्स ■ उत्पादने ■ स्रोत ■ संधी

# होम टेक्सटाइल, होम डेकोर आणि गिफ्ट्स विभागाचा लेखाजोखा

मार्शल्स, एक्सेल वॉल इंटेरिअर्स, एचअॅण्डएच वॉल कव्हरिंग्स, अडॉर्निज, एलजी, अॅटको, आर्टिसन फर्निशिंग्स, इनडिझाइन, श्रॉफ ट्रेडिंग, यूडीसी इम्पेक्स असे काही आघाडीचे ब्रँड्स एचजीएच इंडिया २०१९ मध्ये सहभागी होणार आहेत. वॉलपेपर्ससाठी भारतीय बाजारपेठेत आघाडीवर असणारे यातील बहुतांश ब्रँड्स या प्रदर्शनात आपले नवे कलेक्शन सादर करण्याची शक्यता आहे.

अनेक आघाडीच्या वॉलपेपर कंपन्या हॉल २ मध्ये थेट प्रदर्शन मांडणार आहेत. दुबईस्थित एनजीसी नाफीजतर्फे ओमेक्सो, राश, कॅसेलिओ, वॉलक्वेस्ट, डेकोरलाइन, द पेपर पार्टनरशीप आणि बीएन वॉल्स अशा विविध आंतरराष्ट्रीय ब्रँड्सची नवी प्रीमिअर रेंज सादर केली जाईल. फ्लोअर्स अॅण्ड फर्निशिंगतर्फे कॅसामॅनक आणि हर्लेक्वीनची रेंज सादर केली जाईल. अल्केमी डेकोर आपल्या प्रीमिअर वॉलपेपर्सची रेंज थेट सादर करणार आहे.

**फ्लोअर कव्हरिंग्ज** : उपयुक्त आणि डेकोरेटिव्ह फ्लोअर कव्हरिंग्सची आधुनिक रेंज आता पारंपरिक रग्स आणि कारपेटची जागा घेत आहे. यात वुडन फ्लोरिंग, विनाइल फ्लोरिंग, सिंथेटिक कारपेट आणि कारपेट टाइल्सचा समावेश आहे. कमी देखभाल, डिझाइनचे व्यापक पर्याय आणि रग्स, कारपेट किंवा टाइल्सच्या तुलनेत कमी किंमती यामुळे भारतीय ग्राहकांमध्ये हे फ्लोअर कव्हरिंग्स वेगाने लोकप्रिय ठरत आहेत.

या सर्व प्रकारात भारतात काही थोडकेच उत्पादक आहेत. त्यामुळे, निर्यातीच्या माध्यमातून बहुतांश मागणी पूर्ण केली जाते. रोसेटा, एचव्हीटी इंटेरिअर्स, भिक्षूत्मेपेक्स, पॉलीलीफ, टारकेट, चिराग इंटरनॅशनल हे ब्रँड्स सिंथेटिक फ्लोअर कव्हरिंग्स प्रदर्शित करणार आहेत. तर, मार्कोपोलो, क्रोनोटेक्स, रोसेटा, होगर फ्लोअरिंग्स, चिराग इंटरनॅशनल या प्रस्थापित ब्रँड्स वुडन फ्लोरींग सादर करतील.

**डेकोरेटिव्ह अॅक्सेसरीज अॅण्ड टेबल टॉप्स** : भारतात डेकोरेटिव्ह अॅक्सेसरीजची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. फर्निशिंगचे



मलिक डिझाइन्स

कोणतेही नवे काम न करता रूमचा लुक बदलण्याचा हा सर्वात वेगवान आणि कमी खर्चिक पर्याय आहे. यामुळे सजावट तर होतेच शिवाय रूममधील विशिष्ट भागाला हवा तसा उठाव देता येतो.

म्युरल्स, वासेस, फिगराइन्स, आर्टेफॅक्ट्स, टेबल टॉप्स, क्लॉक्स, मिरर्स, कँडल स्टँड्स, फोटो फ्रेम, मॅगझिन रॅक्स, बॉक्सेस आणि स्मॉल फर्निचरमधील हाताने बनवलेली आणि मशिन मेड अॅक्सेसरी इथे सनराइज, अश्नम, गिफ्ट वर्ल्ड, ह्योशा, मलिक डिझाइन्स, द आर्टिसन हब, पियुश पारेख, नोबेल आर्ट अॅण्ड क्राफ्ट हाऊस, नोबेल फर्निचर, गणेशी लाल ज्वाला, थ्री सिक्स्टी आणि कॉकटेल यासारखे एक्झिबिटर्स प्रदर्शित करतील.

दरवर्षीप्रमाणे एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल फॉर हँडीक्राफ्टने (ईपीसीएच) यंदाही आपल्या हँडीक्राफ्ट निर्यातदार सदस्यांसाठी गट सहभागाचे आयोजन केले आहे. भारतीय रीटेलर्स आणि कॉर्पोरेट गिफ्ट बार्यर्सना मोरादाबाद, सहरानपूर, दिल्ली, जयपरू, जोधपूर, इंदोर, नोएडा आणि अंबाला कांत येथील मेटल, वुड, ग्लास, रबल, टेक्स्टाईल्स आणि इतर प्रकारातील उच्च दर्जाच्या, निर्यात दर्जाच्या हँडीक्राफ्टची व्यापक श्रेणी उपलब्ध करून दिली जाईल.

कर्टन रॉड्स, डोअर नॉब्स, हँडल्स असे डेकोरेटिव्ह हार्डवेअरही बरेच प्रसिद्ध होत आहेत. डेको विंडो, डॉल्फिन, एसक्यूयूतर्फे या उत्पादनांची व्यापक श्रेणी उपलब्ध असेल.

**फ्रॅगनन्स अॅण्ड ड्राय फ्लावर्स** : हा प्रकार तसा भारतीय बाजारपेठेला नवा आहे. साधारण पाच ते सहा वर्षांपूर्वी ही उत्पादने इथे आली. मात्र, भारतात त्यांची मागणी अत्यंत वेगाने वाढत आहे. ही बाजारपेठ वार्षिक २५ ते ३० टक्के या प्रमाणात वाढते आहे.

नैसर्गिक पानेफुले नैसर्गिक वातावरणात सुकवली जातात आणि त्यानंतर ती रंग आणि अप्रतिम हस्त कौशल्याने सजवली जातात. पॉट प्युरी, नॅचरल ड्राय फ्लावर्स, प्लांट्स, आर्टेफॅक्ट्स, नॅचरल मूड क्रीएटिंग फ्लोरल फ्रॅगरन्सेस, स्पा प्रोडक्ट्स, फ्रॅगरंट डेकोरेटिव्ह कँडल्स आणि अनेक प्रकारचे गिफ्ट पॅक्स यामुळे ही उत्पादने सर्वांनाच हवीहवीशी वाटतात. सुंदर सजावटीसोबतच या उत्पादनांमुळे आपल्या आसपास छान, प्रसन्न वातावरण तयार होत असल्याने या उत्पादनांना मागणी आहे.

एचजीएच इंडिया २०१९ च्या हॉल २ मध्ये नेचर्स मेनिया, रोझमुरे, ब्ल्यू ट्री अरोमा, साँग्स ऑफ इंडिया, आयरिस आणि पॅन अरोमा असे काही आघाडीचे ब्रँड्स आहेत.

**आर्टिफिशिअल फ्लावर्स, आर्टिफिशिअल ग्रास आणि ग्रीन वॉल्स** : भारतीय



भिक्षु इम्पेक्ष

बाजारपेठेतील हे सगळे वेगाने वाढणारे विभाग आहेत. वाढत्या मागणीला अनुसरून अधिकाधिक उत्पादक, ब्रँड्स आणि आयातदार या क्षेत्रात प्रवेश करत आहेत. अनेक ब्रँड्स आणि आयातदार हॉल २ मध्ये



मार्कोपोलो



फ्लोर सोल्यूशन



रोसेटा



रोजमूर



नेचर्स मेनिया



क्रिस्टल कॉर्पोरेशन

उपस्थित असतील तर हॉल १ मध्ये अगदी खरी वाटतील अशी फॅब्रिक्स, प्लास्टिक, पेपर, रबर आणि इतर आधुनिक साहित्यापासून बनलेली आर्टिफिशिअल फ्लावर्स, ग्रास, प्लांट्स, क्रीपर्स उपलब्ध असतील. फोर वॉल्स, इंटेरिअर्स अ‍ॅण्ड मोअर, क्रीस्टल कॉर्पोरेशन, फाइन सर्फेस, हेरीटेज, पॉलिनेशन, सुपरग्रास, डेको टर्फ आणि टर्फ ८ अशा काही आघाडीच्या कंपन्या या विभागात आपली उत्पादने प्रदर्शित करतील.

एक्झिबिटरच्या नावासह आर्टिफिशिअल ग्रास किंवा आर्टिफिशिअल फ्लावर्सचा फोटो

**बॅग्स :** गेल्या काही वर्षांपासून विविध कारणांनी बॅग्स भारतीय बाजारपेठेत लोकप्रिय होत आहेत. एक सुयोग्य फॅशन अ‍ॅक्सेसरी किंवा गिफ्ट म्हणून साजेशा बॅग्स हल्ली अनेक प्रकारचे मटेरिअल आणि स्टाइलमध्ये उपलब्ध आहेत. आपल्या पर्यावरण स्नेही देशात प्लास्टिकवर अधिकाधिक बंदी आल्याने हल्ली कॉटन, ज्युट, पॉलिएस्टर, लेदर, रेक्झिन आणि इतर घटकांपासून बॅग्स बनवल्या जातात, आकृती एम्ब्रायडरी, लडलो ज्युट, हितैशी असे काही ख्यातनाम ब्रँड्स आपली उत्पादने मांडतील.


लुडलो जूट



आर्चिज

## पर्सनल अ‍ॅण्ड कॉर्पोरेट गिफ्ट्स

# प्रचंड मोठी भारतीय बाजारपेठ सातत्याने वाढतेच आहे


रतन जयपूर


आर्य २४ कॅरेट


इमेज क्रियेशन


पियुष पारेख

भारत हा बहुधा जगातील सर्वाधिक आदरातिथ्य करणारा आणि सामाजिक देश आहे. भेटवस्तू देणे हा आपल्या संस्कृती, परंपरा आणि सामाजिक चालीरितींचा भाग आहे. व्यावसायिक प्रसंग असो वा वैयक्तिक, भेटवस्तू देण्यात आणि घेण्यात भारत आणि भारतीय हे सर्वात उत्साही असतात. टेक्नोपॅक या भारतातील आघाडीच्या मॅनेजमेंट कन्सलटंटनुसार, आजघडीला भारतीय कॉर्पोरेट आणि वैयक्तिक गिफ्टिंग बाजारपेठ एकूण तब्बल २५०,००० कोटींची आहे. यात भारतातील कॉर्पोरेट गिफ्टिंगची बाजारपेठ सुमारे १२,००० कोटी आहे आणि ती वेगाने वाढतेही आहे.

असे असले तरी भारतातील गिफ्ट बाजारपेठ अत्यंत अनियोजित आहे. या प्रचंड मागणीला काही तुरळक ब्रँड्स आणि रीटेल चेनचाच प्रतिसाद मिळतो. अर्थात, इतर सर्वच विभागांप्रमाणे गिफ्टिंग बाजारपेठही बदलते आहे. वर्षपूर्ती, लग्नसोहळे, वाढदिवस, व्हॅलेंटाइन डे, राखी अशा प्रसंगांपासून अगदी मदर्स डे, फादर्स डे असे अनेक डेज आल्याने आता भेटवस्तू देण्याचे प्रसंग वाढताहेत आणि त्यामुळे पर्सनल गिफ्टिंगची संस्कृतीही फोफावते आहे. इतकेच नाही, ग्राहकांना आता गिफ्ट म्हणून काहीतरी वेगळे खरेदी करायचे आहे जे अनोखे असेल, स्टायलिश, वैयक्तिक असेल आणि त्यांच्या आवडीनिवडींनुसार असेल शिवाय त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला साजेसे असेल.

एचजीएच इंडियाच्या संशोधन टीमच्या अभ्यासानुसार इंडिया इन्कच्या कॉर्पोरेट जगासाठीही गिफ्ट्स म्हणजे आता फक्त जाहिरात न राहता त्यात भावना आली आहे. फार्मास्युटिकल, टेलीकॉम, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, फायनान्स, इन्शुरन्स, हॉस्पिटॅलिटी आणि मीडिया या सारख्या क्षेत्रांमध्ये ज्याला गिफ्ट द्यायचे त्याच्यासोबत वैयक्तिक आणि भावनिक बंध जुळतील अशी भेट देण्याकडे कल झुकतो आहे... मग ते कर्मचारी असोत, ग्राहक असोत की व्यावसायिक भागीदार. ज्याला गिफ्ट द्यायचे त्याला ध्यानात घेऊन अधिक वैयक्तिक स्वरुपातील नाविन्यपूर्ण कल्पनांचा हल्ली लोक शोध घेत असतात.

कॉर्पोरेट गिफ्ट बायर्स, कॉर्पोरेट गिफ्ट सप्लायर्स, डिस्ट्रिब्युटर्स, होलसेलर्स आणि गिफ्ट रीटेलर्स सतत नाविन्यपूर्ण आणि नव्या गिफ्टिंग कल्पनांच्या शोधात असतात आणि ही कधीही न संपणारी वाट आहे. कॉर्पोरेट असो की पर्सनल गिफ्ट, भावना गुंतायला हव्या असतील तर गृह उत्पादनांसारखा चांगला पर्याय नाही.

होम टेक्सटाईल्स, होम डेकोर, हाऊसवेअर, होम असेंट आणि फॅशन अ‍ॅक्सेसरीजशी संबंधित उच्च दर्जाची, ब्रँडेड उत्पादने हा एचजीएच इंडियातील उत्पादनांचा महत्त्वाचा भाग आहे. याआधीही हे स्पष्ट करण्यात आले आहे की एचजीएच भावनिक गिफ्ट बाजारपेठेवर भर देते, जाहिरातबाजीवर नाही. मोठ्या कॉर्पोरेट गिफ्ट बायर्सना व्यापक पर्याय देणाऱ्या या प्रदर्शनात, भेट घेणाऱ्याच्या भावनांचा विचार करून गिफ्ट पॅक्स आणि भेट देण्याजोग्या वस्तू हव्या असणाऱ्या गिफ्ट ट्रेडर्स, होलसेलर्स आणि रीटेलर्ससाठी पुरवठादारही उपलब्ध आहेत.

एचजीएच इंडिया २०१९ च्या हॉल १ मध्ये बेड शीट्स, टॉवेल्स, टेबल आणि किचन लीनन, बेड-इन-अ-बॅग, किड्स अ‍ॅण्ड बेबीज ब्लँकेट, रग्स अशा ब्रँडेड होम टेक्सटाइल्सची व्यापक श्रेणी उपलब्ध असेल. हॉल ३ मध्ये आघाडीचे ब्रँड्स आणि आयातदार तसेच जगभरातील आंतरराष्ट्रीय ब्रँडसची फ्लास्क, बॉटल्स, सीरॅमिक्स अ‍ॅण्ड क्रोकरी, ग्लासवेअर, फाइन कटलरी, फूड कॅरिअर्स, किचनवेअर, किचन अप्लायन्सेस आणि हाऊसहोल्ड आर्टिकल्सची व्यापक श्रेणी उपलब्ध असेल.

आर्चिस, आर्या २४, सनराइज, गिफ्ट वर्ल्ड, ट्युलिप, कॉकटेल, एक दो ढाई, इमेज क्रीएशन, एडीएस, जॉन्स अम्ब्रेला, लडलो ज्युट, हितैशी, रतन पेपर असे काही आघाडीचे भारतीय उत्पादक आणि आयातदार भेटवस्तू पर्यायांवर भर देत आहेत. त्याचप्रमाणे, होम टेक्सटाईल्स, होम डेकोर आणि हाऊसवेअर हॉल्समधील सर्व प्रदर्शक विविध प्रकारचे आवडीनुसारचे आणि तयार गिफ्ट सोल्युशन उपलब्ध करून देतील.

हॉल २ आणि ३ मधील १४ चीनी प्रदर्शक गिफ्टिंग उत्पादनांची व्यापक श्रेणी सादर करणार आहेत. यीवूहैली प्लास्टिक प्रोडक्ट्सतर्फे फोटो फ्रेम्स प्रदर्शित केल्या जाणार आहेत. इतर एक्झिबिटर्स हाऊसवेअर, डेकोरेटिव्ह अ‍ॅक्सेसरीज, फॅशन अ‍ॅक्सेसरीज, ज्युलरी आणि ज्युलरी बॉक्सेस, हँड बॅग्स, लेदर अ‍ॅक्सेसरीज, गिफ्ट पॅकिंग सोल्युशन्सची व्यापक श्रेणी सादर करतील.

प्रदर्शकाच्या नावासह हितैशी किंवा लडलो ज्युट, सनराइज, गिफ्ट वर्ल्ड, एक दो ढाई, रतन पेपर इ.च्या ज्युट आणि कॅन्व्हास बॅगचा फोटो

# एचजीएच इंडियासोबतचा अनुभव



**शालिनी टंडन,**
जनरल मॅनेजर,
शॉपर्स स्टॉप

दरवर्षी हे प्रदर्शन अधिकाधिक छान होत आहे. हे फक्त मी माझ्या सप्लायर्सचा विचार करून म्हणत नाही. तर, दरवर्षी नव्या गोष्टी, नवे प्रयोगा आणि विविध देशांमधील अनेक नवी माणसं इथे भेटतात. अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर यातून माझा बराच वेळ वाचतो. कारण, इथे एकाच व्यासपीठावर मला अनेक आकर्षक वितरक सापडतात, त्यांच्याशी संवाद साधता येतो आणि कितीतरी नवी माणसंही भेटतात. त्यामुळे, हा दरवर्षीचा माझा ठरलेला कार्यक्रम आहे. इथे २ ते ३ दिवस घालवले की मला माझ्या ओळखीच्या माणसांकडील नव्या गोष्टी समजतात आणि अनेक नव्या गोष्टीही कळतात. मला वाटते यातील सर्वात अनोखे वैशिष्ट्य किंवा यूएसपी म्हणजे या प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे एकमेव प्रदर्शन आहे आणि ते ज्या पद्धतीने आयोजित केले जाते ते खरंच कौतुकास्पद आहे. मला वाटते मी परदेशात जी प्रदर्शने पाहिली आहेत हे त्याच दर्जाचे आहे. मला वाटते, घरगुती विभागातील सर्व प्रकारात मला जे वैविध्य इथे पाहता येते त्यामुळे माझ्या घरगुती खरेदीमध्ये काही निसटण्याची शक्यताच उरत नाही.



**राजेश मिश्रा,**
जनरल मॅनेजर इंडिया ॲण्ड
वेस्ट एशिया, कोरल ब्रँड्स

एचजीएच इंडिया हे एक असे व्यासपीठ आहे जे विविध माध्यमांमधील अगदी प्रत्येक ग्राहकाला भेटण्याची आणि आमची उत्पादने प्रदर्शित करण्याची संधी आम्हाला देते. सर्व व्यक्तींसमोर आमच्या ब्रँडचे प्रदर्शन करण्यासाठी संधी देणारे हे एक व्यासपीठ आहे. एचजीएच इंडिया अप्रतिम आहे, भन्नाट आहे आणि ते आम्हाला लोकांना भेटण्यासाठी, त्यांच्याशी आमच्या ब्रँडबद्दल संवाद साधण्याच्या अनेक संधी देऊ करते.



**अडेलहेद डेल्टर :**
बर्गहॉफ -
चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर

बर्गहॉफ खरे तर सहा खंडांमध्ये सुस्थापित आहे. मात्र, भारतात आम्ही आजवर हालचाल केली नव्हती. आता मात्र आम्हाला वाटतंय की भारतातील बाजारपेठ प्रचंड प्रमाणात बदलते आहे आणि मला वाटते ही आशियातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे. हे प्रदर्शन म्हणजे एक ब्रँड म्हणून बर्गहॉफसाठी भारतातील पहिले पाऊल आहे आणि आम्हाला त्याकडून फार अपेक्षा आहेत. या बाजारपेठेत प्रवेश करण्यात आम्हाला साह्य करू शकेल असा भागीदार इथे आम्हला सापडेल, अशी आशा आहे. हा भागीदार एखादा आयातदार किंवा आयातदार आणि वितरक असू शकतो जो आम्हाला संपूर्ण भारतातील वितरणात साह्य करेल. आमच्या उपस्थितीला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे ही फारच चांगली बाब आहे. अनेक व्यक्ती, आयातदार, वितरक आणि रीटेलर्सशी आमच्या गाठीभेटी झाल्या ज्यांनी आम्हाला भारतीय बाजारपेठेची कल्पना दिली. या प्रदर्शनातील सहभाग आमच्यासाठी फारच उत्साहवर्धक आहे.



**अंकित गुप्ता :**
डायरेक्टर, मार्कोपोलो

आम्ही आमच्या मार्कोपोलो या ब्रँडच्या माध्यमातून व्हर्टिकल गार्डन रेंज प्रदर्शित करत आहोत. आम्ही विनाएल फ्लोरिंग आणि वुडन फ्लोरिंगही सादर केले आहे. मागील वर्षी मी ३५ चौ. मी. आकाराच्या बूथमधून सुरुवात केली होती. यंदा ती दुप्पट होईल, अशी आशा आहे. या व्यासपीठातून अनेक वितरक भेटतात आणि हा फार छान अनुभव असतो.



**विनोद खंडेलवाल,**
जनरल मॅनेजर, बाइंग ॲण्ड
मॅन्युफॅक्चरिंग, *@home*

दरवर्षी आम्हाला काही नवे वितरक आणि नवे वेंडर्स भेटतात जे आमच्या आणि एचजीएज इंडियाच्या यशोगाथेत भर घालतात. काही वितरक भारतातील असतात तर काही परदेशी. त्यामुळे आम्हाला दोन्हीकडील वितरक भेटतात आणि त्याचा फायदाच होतो.



**श्रीवर खेरुका :**
मॅनेजिंग डायरेक्टर,
बोरोसिल ग्लास वर्क्स लि.

आम्ही अगदी स्थापनेपासून एचजीएच इंडियामध्ये सहभागी होत आहोत आणि मला वाटते दरवर्षी आमचा बूथही मोठा मोठा होतोय. म्हणजेच व्हिजिटर्सची संख्याही वाढतेय आणि या प्रदर्शनाचा आवाकाही. आमची नवी उत्पादने प्रदर्शित करण्यासाठी आम्हाला हे फार छान व्यासपीठ वाटते. आमचे सगळे ग्राहक इथे येतात, मग ते खास रीटेलर्स असोत की लार्ज फॉरमॅट स्टोअर्स. सगळेच इथे येतात त्यामुळे आमच्या मते आमच्या क्षेत्रासाठी हे खूप छान व्यासपीठ आहे.



**उमेश गुप्ता,**
व्हाईस चेअरमन, बर्गनर

आम्ही परदेशातही ट्रेड शोमध्ये सहभागी होत असतो. पण, भारतात असे व्यासपीठ आहे, हे मला माहीतच नव्हते. बर्गनर हा जगभरातील किचनवेअर सोल्युशन प्रोव्हायडर आहे. विकास खन्ना यांना आमचे ब्रँड ॲम्बेसेडर बनवून आम्ही भारतात आलो. आम्ही हाय-टेक प्रीझम सादर केला आहे. हे ट्राय प्लाय कुकवेअर नॉनस्टिक कोटिंगसह आहेत. प्रत्येक भारतीय महिलेला स्वप्नवत वाटावी अशी कुकवेअर किंवा नॉनस्टिक कोटिंगवर १० वर्षांची गॅरंटी देणारी आमची पहिली कंपनी आहे.



**अजय तलवार,**
वाईस प्रेसिडंट- जनरल
मर्कंडाइझ ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स,
स्पार इंडिया

आम्ही चायनालाही जातो मात्र या शोमुळे हाऊसवेअरसाठी भारत हे आमचे ठरलेले स्थळ झाले आहे. आम्ही या प्रदर्शनात येतो आणि आमच्या व्यवसायाचा भाग बनू शकतील अशी नवी उत्पादने, नवे सप्लायर्स धुंडाळतो. मी हे खात्रीने सांगू शकतो की दरवर्षी आम्हाला काहीतरी अनोखे, वेगळे सापडते आणि नवे वितरक आमच्याशी जोडले जातात. ही माणसे खरंच फार छान आहेत आणि आम्हाला इथे चांगल्या किमतीत उत्पादने उपलब्ध असल्याने आम्हीही ग्राहकांना उत्तम किंमत देऊ शकतो.



**दीपक अग्रवाल,**
डायरेक्टर, क्ले क्राफ्ट इंडिया

आमच्या डोमेस्टिक रीटेल आणि न्यू लॉंचेससाठी आम्ही एचजीएच इंडिया या एकमेव प्रदर्शनात सहभागी होतो. आम्ही एचजीएच इंडियामध्ये सादर करण्यासाठी नवी उत्पादने डिझाइन करतो आणि बनवतो. एचजीएच इंडियाच्या माध्यमातून आम्ही कन्व्हेंशनल रीटेलर्सवर तसेच आधुनिक रीटेलवर भर देतो आणि दोन्हीसाठी आमची उत्पादने सादर करतो. शेफ संजीव कपूर यांच्या ब्रँडचे आम्ही सोल ऑथराइज्ड लायसेन्सी आहोत. आम्ही नुकतेच मुंबईतील कृष्णा मेहता यांच्या इंडिया सर्कल या डिझायनर ब्रँडसासेबत सहकार्य केले आहे आणि यूएसएस्थित ब्रँड हॅप्पीनेसचे आम्ही लायसेन्सी आहोत. आमच्यासाठी हे तीन महत्त्वाचे मुद्दे आहेत आणि या सर्व ब्रँड्सचे आम्ही एकमेव लायसेन्सी आहोत.



**आलोक बॅनर्जी :**
सीओओ, द बॉम्बे डाइंग ॲण्ड
मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

हा एक अप्रतिम शो आहे आणि आमचे ग्राहक आणि या व्यवसायात आपल्यासोबत जोडल्या गेलेल्या लोकांना भेटण्यासाठी हे एक सुयोग्य व्यासपीठ आहे. त्यामुळे, तुमची उत्पादने सादर करण्यासाठी, त्यांच्याबद्दलची माहिती देण्यासाठी आणि त्यांना पुढे नेण्यासाठी हे एक छान व्यासपीठ आहे. आम्ही या शोसंदर्भात आनंदी आणि समाधानी आहोत. यात सहभागी झाल्याने आमच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि त्याबद्दल जागरुकता आणण्यात आम्हाला साह्य लाभते. ऑटम/विंटर मोसमापर्यंत आमची विक्री पूर्ण झालेली असते त्यामुळे इथे फारच कमी बुकिंग्स आम्ही घेतो. मात्र, एचजीएज इंडियामुळे आमची कंपनी नेमके काय करते हे डीलर्सना कळते. उदा. आम्ही नुकतीच 'मेक युवर ओन बेडशीट' ही नाविन्यपूर्ण संकल्पना राबवली. यात तुम्ही तुमच्या डिझाइन्स पाठवा आणि आम्ही फक्त १९९९ रुपयांत तुमच्या डिझाइनप्रमाणे बेडशीट बनवून ३० दिवसांच्या आत तुमच्याकडे पाठवू. आम्ही एचजीएज इंडियामध्येच ही संकल्पना राबवली.



**दारिया शिलोवा,**
एक्स्पोर्ट मॅनेजर,
अब्रासिव्ह टेक्नॉलॉजिस,
रशिया

मी अब्रासिव्ह टेक्नॉलॉजिस या रशियन कंपनीचा प्रतिनिधी आहे. सेंट पीटर्सबर्गमधील आमची ही कंपनी नॉन-वुवन, विशेषतः व्हिस्कोस आणि अब्रासिव्ह मटेरिअल बनवते. आम्ही इथे अनेक महान व्यक्तींना भेटलो. भारतीय व्यावसयिकांसोबत आम्ही इथे व्यवसाय करू शकू आणि आमच्या उत्पादनांसाठी, लेमन मून उत्पादनांसाठी इथे भारतीय बाजारपेठेत आम्हाला ग्राहकवर्ग मिळेल, अशी आशा आहे. कारण, सध्या जगात भारतीय बाजारपेठच सर्वाधिक उत्क्रांत होत आहे, असे आम्हाला वाटते. आमच्या उत्पादनांमधील मूळ घटक फार उत्कृष्ट आहे आणि भारतीय गृहिणींच्या गरजा भागवणारा आहे. त्यामुळे, भारतीय कुटुंब आणि गृहिणी भांडी, क्रोकरी स्वच्छ करण्यासाठी आमची उत्पादने वापरतील, अशी आम्हाला आशा आहे.



**प्रियंका आर्या,**
ओनर, आर्टिसन

आर्टिसन ही वॉलपेपर कंपनी लक्झ्युरी तसेच परवडणाऱ्या दरातील वॉल कव्हरिंग्स आयात करते. आम्ही पहिल्यांदाच एचजीएच इंडियामध्ये सहभागी होत आहोत. हा सुंदर प्रवास आहे आणि तितकाच सुंदर अनुभवही. आम्ही एचजीएच इंडियामध्ये प्रवेश केला तेव्हापासूनच हे अत्यंत नियोजित पद्धतीने सुरू असल्याचं आम्हाला जाणवलं. अगदी लहानमोठ्या बाबींचा इथे विचार केला जातो. एकुणातच, इथला प्रतिसाद अप्रतिम आहे.